राज्य योजनेंतर्गत सन २०१७-१८ शासकीय अभिकरणाकडून समुपयोजनासाठी (जळाऊ लाकूड व दगडी कोळसा) अनुदान वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१७/प्र.क्र.२६१/फ-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १३ ऑक्टोबर, २०१७

<u>वाचा :-</u>

१) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अंर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.४.२०१७
२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दिनांक ३०.०६.२०१७
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य,नागपूर यांचे क्र.कक्ष १/पी/यो/नबाप्र/चाबाप्र/प्र.क्र. ३८/१०९६/२०१७-१८, दिनांक ६.०९.२०१७

<u>प्रस्तावना :-</u>

राज्य योजनेतंर्गत सन २०१७-१८ मध्ये शासकीय अभिकरणाकडून समुपयोजनासाठी (जळाऊ लाकूड व दगडी कोळसा) (२४०६ ०४८१) या योजनेकरिता रू.१०००.०० लक्ष नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पीत करण्यात आलेला आहे. सदर अर्थसंकल्पित निधीच्या शिल्लक नियतव्ययाच्या अनुषंगाने मुख्य वनसंरक्षक (प्रा.) नाशिक व पुणे या वनवृत्ताकडून प्राप्त झालेल्या सन २०१७-१८ मध्ये राज्य योजनेअंतर्गत शासकीय अभिसरणाकडून समुपयोजन (जळाऊ लाकूड व दगडी कोळसा) नवीन बाब प्रस्तावांतर्गत खर्च भागविण्याकरीता रू. ८.६४ लक्षचा मंजूरी मिळणेबाबतचा प्रस्ताव संदर्भाधीन क्रमांक ३ च्या पत्रान्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी प्रस्ताव सादर करुन निधी वितरीत करण्यास शिफारसीसह विनंती केली आहे. त्यानुसार या कामासाठी अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

राज्य योजनेतंर्गत सन २०१७-१८ मध्ये शासकीय अभिकरणाकडून समुपयोजनासाठी (जळाऊ लाकूड व दगडी कोळसा) (२४०६ ०४८१) या राज्य योजनेअंतर्गत रू.१०००.०० लक्ष नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पीत करण्यात आलेला आहे. सदर अर्थसंकल्पित निधीमधून शिल्लक नियतव्ययाच्या अनुषंगाने संदर्भाधीन क्रमांक ३ च्या पत्रान्वये (२४०६ ०४८१) या योजनेंतर्गत मुख्य वनसंरक्षक (प्रा.) नाशिक व पुणे या वनवृत्तातील सदर कामांकरीता प्राप्त नवीन बाब प्रस्तावांतर्गत खर्च भागविण्याकरीता रू. ८.६४ लक्ष इतका निधी (४४०६ ०४८१) या लेखाशिर्षा अंतर्गत विहीत केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर तरतूद खर्च करतांना वित्त विभागाने वेळो वेळी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करावे. वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गतच्या तरतूदीचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी.
२. प्रत्यक्ष खर्च करण्यापूर्वी विहीत पध्दतीचे पालन करावे व आवश्यकतेनुसार आहरण करावे.

३. सदर खर्च वित्त विभागाच्या दिनांक ३०.०६.२०१७ च्या परिपत्रकातील व त्यासोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या अटीची पूर्तता होईल, याची दक्षता घेण्यात यावी.
४. सदर मंजूरीस शासन निर्णय क्रमांक एमएससी- २०११/प्र.क्र. १७८/फ-५, दिनांक ३०.९.२०११ च्या परिशिष्टात नमुद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक असतील.

उपरोक्त खर्च मागणी क्रमांक सी-७, प्रधान शिर्ष २४०६, वनीकरणे व वन्यजीवन, (०१)(०४), शासकिय अभिकरणाकडून समुपयोजन (जळाऊ लाकूड व दगडी कोळसा) (२४०६ ०४८१) या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ करिता उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक १८.४.२०१७ व दिनांक ३०.०६.२०१७ च्या परिपत्रकान्वये तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२, दिनांक १७.४.२०१५ मधील भाग पहिला, उपविभाग-३, परिच्छेद २७ (२) अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०१३१७१०३०६२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2017.10.13 16:59:25 +05'30'

(सूजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रत :-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन शिक्षण व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४. मुख्य वनसंरक्षक (शिक्षण व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), नाशिक व पुणे
६. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
७. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई-३२.
८. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
९. फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१०. कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)